अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## भारताने इंग्लंडविरुद्ध ४-१ ने कसोटी मालिका जिंकली!




✔ **धर्मशाला** : इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या कसोटीत टीम इंडियाने एक डाव आणि ६४ धावांनी मोठा विजय मिळवला. या विजयासह भारताने पाच सामन्यांची मालिका ४-१ अशी जिंकली. पाचव्या कसोटीच्या दुसऱ्या डावात आर अश्विनने इंग्लंडचा निम्मा संघ तंबूत धाडला. त्यामुळे कसोटीच्या तिसऱ्याच दिवशी भारताने विजय मिळवला.

या कसोटीत इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात २१८ धावा केल्या होत्या. त्यानंतर टीम इंडियाने ४७७ धावांचा डोंगर रचून, इंग्लंडवर २५९ धावांची आघाडी घेतली होती. भारताची ही भली मोठी आघाडी इंग्लंडला झेपली नाही. इंग्लंडचा संपूर्ण संघ दुसऱ्या डावात १९५ धावांत गारद झाला. त्यामुळे भारताने ही कसोटी एक डाव आणि ६४ धावांनी खिशात टाकली.

दरम्यान, आज तिसऱ्या दिवशी भारताने ८ बाद ४७३ धावांवरुन खेळाला सुरुवात केली. भारताचे शेवटचे दोन फलंदाज अवघ्या ४ धावा करुन माघारी परतले. ठराविक टप्प्यात तिघांनी विकेट्स घेतल्याने, इंग्लंडचा दुसरा डाव १९५ धावांत आटोपला. त्यामुळे भारताने मोठ्या विजयाची नोंद केली. अश्विनने ५, कुलदीप आणि बुमराहने प्रत्येकी २ आणि तर रवींद्र जाडेजाला १ विकेट मिळाली.

www.surajyadigital.com । रविवार, दि. १० मार्च २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १६१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# भाजपाच्या जागावाटप चर्चेत ‘रिपब्लिकन’ वंचितच!

## माढ्यावरील अजित पवारांचा दावा फेटाळला! सोलापुरातून सुरेश खाडे रिंगणात?




✔ नवी दिल्ली, सोलापूर/विशेष प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाने राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) चार जागा तर शिवसेना एकनाथ शिंदे गटाला केवळ १० जागा देणार असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, रिपब्लिकन पक्षाच्या रामदास आठवले या जागा वाटपाच्या चर्चेत कोठेही नव्हते. इतक्या कमी जागा घेऊन आम्ही मतदारांपुढे कसे जायचे असा प्रश्न शिंदे आणि पवार यांनी उपस्थित केला. त्यावर मोदी यांचे नाव हेच याचे उत्तर आहे. त्यांना पुन्हा पंतप्रधान बनवणे यालाच आपल्या सर्वांचे प्राधान्य असायला हवे, असे उत्तर देण्यात आल्याने दोघे निरूत्तर झाल्याचे सूत्रांनी सांगितले.



दरम्यान, रायगडसाठी अजित पवार हे आग्रही होते. रायगड आणि माढा हे मतदारसंघ आम्हाला हवेत. या मतदारसंघात आमजी अधिक ताकद आहे, असा युक्तिवाद अजित पवार यांनी केला. माढा मतदारसंघाचा खऱ्या अर्थाने विकास भारतीय जनता पक्षाने केला आहे. विद्यमान खासदार हे भारतीय जनता पक्षाचे आहेत. त्यामुळे हा मतदार संघ देणार नसल्याचे स्पष्ट करतानाच रायगडमधील विद्यमान खासदार सुनील तटकरे यांच्याविषयी जनतेत नाराजी असल्याचे सांगत त्याबाबतच्या सर्वेक्षण अहवालच समोर ठेवण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान भारतीय जनता पक्षाच्या पहिल्या यादीत महाराष्ट्रातील कोणीही नसल्याने दुसऱ्या यादीत हे उमेदवार जाहीर होण्याची शक्यता आहे. ही यादी रवीवारी सायंकाळी किंवा सोमवारी दुपारी जाहीर होईल, असा अंदाज एका नेत्याने व्यक्त केला आहे.





### लवकरच उमेदवार जाहीर!

सोलापुरात प्रणिती शिंदे यांनी आपली उमेदवारी निश्चित मानून प्रचाराचा पहिला टप्पा जवळपास पूर्ण केला आहे त्यांना या दौऱ्यात प्रतिसाद मिळत आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष येथील उमेदवार लवकर जाहीर करेल, अशी अटकळ राजकीय निरीक्षक व्यक्त करत आहेत.



### सोलापुरातून सुरेश खाडे रिंगणात?

आपण सोलापूर मतदार सं्तून लोकसभा निवडणूक लढवण्यास तयार असून उमेदवारी मिळाल्यास आपण ती लढवू, अशी माहिती राज्याचे कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी पंढरपुरात पत्रकारांना दिली. पंढरपुरात त्यांनी ही माहिती दिल्यानंतर भाजपची उमेदवारी त्यांना मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली. भारतीय जनता पक्ष अचानक उमेदवार जाहीर करून विरोधकांची कोंडी करतो, अशी माहिती पक्षातील एका ज्येष्ठ नेत्याने सुराज्यला दिली.

### आरोप करणे अवघड

नवा उमेदवार जर माहीत नसेल तर त्याची माहिती काढेपर्यंत निवडणुका होऊन जातात. त्यामुळे प्रचारात त्याच्यावर व्यक्तीगत आरोप करणे शक्य होत नाही त्याचा लाभ पक्षाला मिळतो, असेही या नेत्याने सांगितले. या आधारेच खाडे यांनी पंढरपुरात आपण उमेदवारीसाठी इच्छूक असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनाही उमेदवारी मिळू शकते, अशी शक्यता व्यक्त होत आहे.

### राज्यातील मंत्री लोकसभेच्या मैदानात

खाडे हे सध्या मिरज मतदारसंघातून आमदार असून त्यांची यंदा मंत्रीमंडळात वर्णी लागली आहे. पहिल्या यादीत राज्यातील मंत्र्यांना लोकसभेच्या मैदानात उतरवण्याचे धोरण भाजपने आखल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यादृष्टीनेही खाडे यांच्या इच्छेकडे पाहिले जात आहे.

## हिमाचल प्रदेशमध्ये ‘ऑपरेशन कमळ’

**काँग्रेसच्या सहा आमदारांसह ११ आमदार भाजपाशासित उत्तराखंडमध्ये दाखल**



✔ **नवी दिल्ली** : हिमाचल प्रदेशचे सहा बंडखोर आमदार ज्यांना अपात्र केले गेले होते, ते आमदार हिमाचल प्रदेशहून उत्तराखंडच्या ऋषिकेश येथे पोहोचले असल्याचे सांगितले जाते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या आमदारांबरोबर तीन अपक्ष आमदार आणि दोन भाजपाचे आमदार उपस्थित होते.

ऋषिकेश येथील ताज हॉटेलमध्ये ११ आमदार मुक्कामी थांबले आहेत. तसेच हरियाणा पोलीस या आदारांना सरंक्षण देण्यासाठी पोहोचले असल्याचीही माहिती सूत्रांनी दिली. हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुख्खूनी सहा बंडखोर आमदारांबाबत नरमाईची भूमिका घेतल्यानंतर ही घडामोड घडली आहे. हरियाणा राज्याची नंबर प्लेट असलेली एक बस शनिवारी सकाळी ऋषिकेशमधील ताज हॉटेलबाहेर असल्याची माहिती एएनआय या वृत्तसंस्थेने दिली. या बसमध्ये पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात ११ आमदार, ज्यामध्ये काँग्रेसच्या सहा बंडखोर, तीन अपक्ष आमदारांचा समावेश होता. तर दोन जण भाजपाचे आमदार असल्याचे सांगितले जाते.

मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुख्खू हे शुक्रवारी दिल्लीत काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेण्यासाठी गेले होते. आगामी लोकसभा निवडणूक आणि (पान ७ वर)

## मराठ्यांची आज तातडीची बैठक

**लोकसभा निवडणुक संदर्भात समाजाची ठरणार भूमिका**

✔ **सोलापूर** : सोलापूर शहर आणि जिल्हा सकल मराठा समाजाची आज रविवारी सातरस्ता परिसरातील शासकिय विश्रामगृहात सकाळी ११ वाजता बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकित लोकसभा निवडणुकित समाजाची भूमिका काय असावी? यावर चर्चा होऊन सर्वसमावेश धोरण ठरविले जाणार असल्याचे समाजाचे नेते राजन जाधव यांनी सांगितले. या समाजाला ५० टक्याच्या आत ओबीसीमधून आरक्षण देण्याची आग्रही मागणी आहे. तथापि, सरकारकडून या संदर्भात निर्णय घेतला जात नाही. कुणबी नोंदी सापडलेल्यांच्या सग्यासोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची अधिसुचना सरकारने काढली मात्र त्याची अंमलबजावणी केली जात आहे. सरकारवर दबाव टाकण्यासाठी नवीन धोरण निश्चित केले जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर, लोकसभा निवडणुकित (पान ७ वर)

## रेल्वे चालकाच्या सतर्कतेमुळे महिलेचे प्राण वाचले...



**महिला दिनाच्या रात्री होणारी दुर्घटना टळली**

✔ **कुर्डूवाडी** : परळी -पनवेल (गाडी नं १७६१४) रेल्वे गाडी समोर रुळामध्ये उभारलेल्या महिलेचे प्राण रेल्वे चालकाच्या प्रसंगावधानामुळे वाचले. ही घटना महिला दिनाच्या रात्री दि. ८ रोजी रा. १२.३० वाजता सुमारास लातुर रेल्वे स्टेशन स्टाटर समोर घडली. महिला नेमके कशासाठी रुळामध्ये उभी होती याचे नेमके कारण मात्र समजू शकले नाही.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार दि. ८ रोजी रा.१२.३० वा. सुमारास परळी - पनवेल ही लातुर स्थानकातून निघाली असता अवघ्या काही अंतरावरच स्टार्टर सिग्नल समोर एक महिला रुळामध्ये येऊन थांबली. तेवढ्यात गाडीचे लोकोपायलट एस पी वाघमारे व सहा. लोकोपायलट प्रदीप शेळके यांनी हॉर्न वाजवून तिला बाजूला होण्यासाठी सतर्क केले.परंतू सदर महिला ही रुळातून बाजूला हटत नसल्यामुळे चालकांनी गाडी थांबवली. सदर महिलेची विचारपूस (पान ७ वर)

## भाजपा-टीडीपी-जेएसपीची आंध्र प्रदेशमध्ये युती

**▸ जनसेना पार्टी आणि भाजपला लोकसभेच्या २४ जागांपैकी ८ जागा**



✔ **नवी दिल्ली** : आंध्र प्रदेशमध्ये तेलुगू देसम पार्टी (टीडीपी), जनसेना पार्टी (जेएसपी) आणि भाजपा यांच्यातील जागा वाटपाच्या सूत्रावर एकमत झाल्याचे म्हटले जात आहे.

लवकरच या तिन्ही पक्षांच्या युतीची घोषणा होण्याची शक्यता आहे. शुक्रवारी या तिन्ही पक्षांतील महत्त्वाच्या नेत्यांची एक बैठक झाली. त्यानंतर जागावाटपाच्या सूत्रावर एकमत झाल्याची खात्रीलायक माहिती समोर येत आहे. आंध्र प्रदेशमध्ये जनसेना पार्टी आणि भाजपा यांना लोकसभेच्या २४ जागांपैकी ८ जागा देण्यात आल्या आहेत. उर्वरित जागा या टीडीपी पक्षाला देण्यात येतील. आंध्र प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीसाठी एकूण १७५ जागांपैकी २८ ते ३२ जागा जनसेना पार्टी आणि भाजपाला देण्यात (पान ७ वर)

## राष्ट्रवादीचा पहिला उमेदवार जाहीर

**सुनेत्रा पवार यांच्याशी सुप्रिया सुळेंची गळाभेट अन् सायंकाळी उमेदवारी**

✔ **भोर** : बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे या निवडणूक लढविणार हे स्पष्टच असले तरी आज पक्ष म्हणून त्यांची अधिकृत उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार पक्षाने जाहीर केली. बारामती लोकसभेतील भोर विधानसभेत आयोजित ‘महासभा एकनिष्ठेची, या महाविकास आघाडीच्या शेतकरी मेळाव्यात बोलत असताना शरद पवार यांनी ही घोषणा केली. विशेष म्हणजे आजच बारामती लोकसभा मतदारसंघात अजित पवार गटाच्या कथित उमेदवार सुनेत्रा पवार आणि सुप्रिया सुळे यांची अचानक भेट झाली होती. दोघींनी गळाभेट घेऊन एकमेकांची विचारपूसही केली होती. त्यानंतर सायंकाळी शरद पवार यांनी



सुप्रिया सुळे यांची उमेदवारी घोषित करून अधिकृतपणे प्रचाराचे रणशिंग फुंकले.

आपल्या भाषणाच्या सुरुवातीला शरद पवार यांनची मोदी सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, मोदी गॅरंटी असा प्रचार केला जात आहे. पण आधी दिलेल्या गॅरंटींचं काय झालं? परदेशातला काळा पैसा आणेन आणि शेतकऱ्यांच्या खिशात टाकेल, असे मोदींनी सांगितले होते. पण एक दमडी परदेशातून आली नाही. दोन वर्षांपूर्वी दिल्लीच्या सीमेवर पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेशमधील शेतकरी हजारोंच्या संख्येने आले होते. एक वर्ष शेतकरी दिल्लीच्या थंडीत, पावसाळा आणि कडक उन्हात आंदोलनाला बसले. पण वर्षभरात एकदाही ढुंकून बघण्याचे कष्ट घेतले नाहीत. त्यामुळे मोदींच्या गॅरंटीवर आम्हाला विश्वास नाही.

आज बेरोजगारीची मोठी समस्या उभी राहिली आहे. हजारो तरूण नोकरीसाठी वण-वण हिंडत आहेत. मला आजही हाती पत्र आले की, अमुक एक तरूणाला नोकरीची आवश्यकता आहे, कुठे तरी पाहा. तरुणांची फौज देशाच्या भल्यासाठी वापरण्याऐवजी त्यांना बेकार ठेवण्याचे आणि त्यांचे घर संकटात (पान ७ वर)

## तौल-मौल के बौल...




**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना ही शरद पवार यांनी केली आहे. चिन्ह आणि पक्ष हे शरद पवार यांचेच आहेत. आमची त्यांच्याशी (अजित पवार गट) तत्त्वाची लढाई आहे. अरे प्रेमाने मागितलं असतं तर आम्ही दिलदारपणे दिलं असतं. अदृश्य शक्तीची लढाई ही मराठी माणसाच्या विरोधात आहेत. आम्ही महाराष्ट्राचं वाटोळं करू असं अदृश्य शक्तींना वाटत असेल तर ते आम्ही करू देणार नाही. आमची लढाई सत्तेच्या उन्मादाविरोधात आहे. ही लढाई आम्ही लढत राहू.**



**– सुप्रिया सुळे,** खासदार, शरद पवार गट

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सध्या ते ‘असेच’ फिरताहेत !

कल्याण

479-03-256

## विडी घरकुलात कार्यकर्त्यांमध्ये वादावादी; कोठे, देशमुखांचा पोलिस ठाण्यात ठिय्या

✔ **सोलापूर** : हैदराबाद रस्त्यावरील विडी घरकुलात आमदार विजयकुमार देशमुख आणि शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी महापौर महेश कोठे यांच्या समर्थकांमध्ये आज शनिवारी वादावादी झाली.या घटनेची माहिती कळताच महेश कोठे, विजयकुमार देशमुख, डॉ. किरण देशमुख, प्रथमेश कोठे, चेतन नरोटे यांच्यासह त्यांचे खास समर्थक अक्कलकोट रोड एमआयडीसी पोलीस ठाण्यात पोचले. परस्परांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यसाठी संबंधितांनी पोलीस ठाण्यात बऱ्याच वेळा ठिय्या मांडला होता. येथे कार्यकर्त्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपही झाले. दरम्यान, याप्रकरणी कोणावरही गुन्हा दाखल झाला नसल्याचे सांगण्यात आले.


वैष्णव मारुती मंदिर ते राज इंग्लिश मीडियम स्कूलपर्यंतच्या रस्ता डांबरीकरणाच्या उद्घाटनाचे कारण कोठे आणि देशमुख यांच्या कार्यकर्त्यांच्या भांडणाला असल्याची चर्चा होती. देशमुख समर्थक सतीश भरमशेट्टी आणि त्यांच्या पत्नी लक्ष्मी या जखमी झाल्याचा दावा केला. त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असल्याचे सांगण्यात आले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, आमदार विजयकुमार देशमुख तसेच त्यांचे सुपुत्र डॉ.किरण देशमुख यांनी माध्यमांना माहिती देण्याचे टाळले.



जुन्या विडी घरकुलात केंद्र सरकारच्या स्वच्छ वायू योजनेतून वैष्णव मारुती मंदिर ते राज इंग्लिश मिडियम स्कूलपर्यंतच्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम मंजूर झाले आहे. त्यासाठी एक कोटी १३ लाखांचा निधी आहे. आज सकाळी दहा वाजता आमदार विजयकुमार देशमुखांच्या हस्ते या कामांचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमानंतर केकडे नगरात पिण्याच्या पाण्याच्या कामाचे उद्घाटन करण्यासाठी गेलो होतो. प्रतिकार्यक्रम करु नका, असे समजून सांगण्याचा प्रयत्न करीत होतो. त्यावेळी मला आणि पत्नीस मारहाण झाली. दोषींवर कारवाई व्हावी. कोठेंना कार्यक्रमांचे उद्घाटन करण्याचा अधिकार नाही.

- **सतीश भरमशेट्टी,** देशमुख समर्थक, सरवदे नगर, विडी घरकुल

मी ‘उत्तर’ मधून निवडणूक लढविणार असल्याचे समजताच भाजपाला पोटदुखी सुरु झाली आहे. आमचा कोणत्याही विकास कामांना विरोध नाही. आतापर्यंत भाजपाचे पाच खासदार झाले. आमदार विजयकुमार देशमुख हे वीस वर्षापासून नेतृत्व करतात. त्यांनी किती निधी विडी घरकुलला दिला? आत्ताच त्यांना विडी घरकुल कसे दिसले? विडी घरकुलात आत्तापर्यत आम्हीच महापालिकेच्या निधीतून विकास साधला आहे. आम्ही विकास केला नसता तर ७५ टक्के घरकुल रिकामे झाले असते. आम्ही केलेल्या विकासामुळे या भागातील प्लॉट दहा ते बारा हजार रुपये फुटाने गेले आहेत. संबंधितांना विकास सहन होत नाही. येथील नागरिकांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे. ४० हजार मतांचा धसका घेऊन विडी घरकुलचे वातावरण खराब करण्याचे काम त्यांच्या लोकांकडून सुरु आहे. जे काही घडले ते बघा. व्हिडीओ शुटींग बघा.घटनेवेळी संबंधित व्यक्तीची पत्नी नव्हती. बायकोच्या नावे खोटी तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न चुकीचा आहे, संबंधितास वरिष्ठांनी समज द्यावी. अन्यथा आम्हाला एकत्र यावे लागेल. दाखवून द्यावे लागेल. दूध का दूध अन् पाणी का पाणी.



- **महेश कोठे,** माजी महापौर